(इंग्रजी टंकलिखित न्यायनिर्णयाचे मराठी भाषांतर)

सेंट्रल बँक ऑफ इंडिया

विरुद्ध

नितिन

(दिवाणी अपील क्रमांक ५१११/२०२२)

०३ ऑगस्ट २०२२

[न्यायमूर्ती इंदिरा बॅनर्जी आणि न्यायमूर्ती व्ही. रामासुब्रमण्यम]

सेवाविषयक विधी – अनुकंपा नियुक्ती – अपीलकर्ता-बँकेत कार्यरत असलेल्या प्रतिवादी-रिट याचिकाकर्त्याच्या वडिलांनी वैद्यकीय अपंगत्वाच्या कारणास्तव स्वेच्छापूर्व निवृत्ती करिताअर्ज केला – अपीलकर्त्याने त्यास परवानगी दिली आणि २६.०६.२०१५ पासून त्याला कामावरून मुक्त करण्यात आले - प्रतिवादीने अपीलकर्त्याच्या अनुकंपा नियुक्ती योजनेच्या अनुषंगाने वडिलांच्या जागी अनुकंपा नियुक्तीसाठी अर्ज केला - अर्जात प्रतिवादीने आपण खाजगी बँकेत कार्यरत असल्याची बाब दडवून ठेवली - या योजनेअंतर्गत अपीलकर्ता-बँकेने स्थापन केलेल्या समितीने निवृत्त कर्मचाऱ्याचे कुटुंब योजनेअंतर्गत आवश्यकतेनुसार गरीब नसल्याच्या कारणास्तव प्रतिवादीचा अर्ज फेटाळला - उच्च न्यायालयाने असे म्हटले की कुटुंब गरीब आहे किंवा नाही हे अनुकंपा नियुक्ती नाकारण्याचे कारण असू शकत नाही आणि अपीलकर्त्याला अनुकंपा नियुक्तीसाठी प्रतिवादीच्या प्रकरणाचा विचार करण्याचे निर्देश दिले - अपील मध्ये, मानले की: अपीलकर्ता बँकेच्या अनुकंपा नियुक्ती योजनेअंतर्गत अनुकंपा नियुक्तीसाठी पात्रतेचे आर्थिक निकष आहेत आणि अशा नियमांचा काटेकोरपणे अर्थ लावावा लागेल कारण अनुकंपा नियुक्ती समतेच्या नियमाला अपवाद आहे - प्रतिवादीचा अर्ज आणि रिट याचिका ही

वस्तुस्थिती दडवल्याच्या एकमेव कारणास्तव फेटाळली जाऊ शकते - उच्च न्यायालयाचा आक्षेपार्ह निर्णय रद्द करण्यात आला.

अपील अधिनिर्णित करत न्यायालयाने स्पष्ट केले की –

१. अनुकंपा नियुक्ती हा समानतेच्या नियमाला अपवाद आहे, हे तथ्य सर्वमान्य आहे, जे ह्या बाबीस पुष्टी देते की कमावत्या कर्मचाऱ्याच्या अपंगत्वामुळे उद्भवलेल्या तात्कालिक संकटावर मात करण्यासाठी वैद्यकीय दृष्ट्या अक्षम कर्मचाऱ्यास त्याला निवृत्त होण्याशिवाय पर्याय नसतो किंवा कुटुंबातील एकमेव कमावत्या कर्मचाऱ्याच्या मृत्यूमुळे अन्य पर्याय उपलब्ध नसलेल्या कुटुंबाची तत्काळ व्यवस्था होणे आवश्यक असते. [परिच्छेद २०] [१०८३-सी]

२. या प्रकरणात अनुकंपा नियुक्ती योजने अंतर्गत अनुकंपा नियुक्तीसाठी पात्रतेचे आर्थिक निकष आहेत. अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीसाठी आर्थिक निकषांची तरतूद करणारे नियम वैध आणि कायदेशीर आहेत ज्यांचा काटेकोरपणे अर्थ लावावा लागेल, अन्यथा अनुकंपा नियुक्तीसाठी राखीव कोटा अधिक आणि / किंवा तीव्र आर्थिक संकटात असलेल्या इतरांना वगळून भरला जाईल. [परिच्छेद २१] [१०८३-ई]

३. स्टेट बँक ऑफ इंडिया विरुद्ध राजकुमार (२०१०) ११ एससीसी ६६१ या खटल्यात या न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार, अनुकंपा नियुक्तीचा दावा केवळ नियोक्त्याने अशा रोजगारासाठी तयार केलेल्या योजनेपुरताच आहे आणि अशा योजनेबाहेर कोणताही अधिकार नाही. केवळ अर्ज केला म्हणून स्वयंचलितपणे नियुक्ती होऊ शकत नाही. प्रतिवादी-रिट याचिकाकर्त्याला निवृत्त कर्मचाऱ्याचे आश्रित

कुटुंबीय म्हणून नोकरीचा कोणताही विशेष दावा किंवा विशेष अधिकार नव्हता. [परिच्छेद २२] [१०८३एफ-जी]

४. अनुकंपा नियुक्तीच्या अर्जात प्रतिवादीने आयसीआयसीआय बँकेतील आपली नियुक्ती दडवून ठेवली होती, याकडे उच्च न्यायालयाने पूर्णपणे दुर्लक्ष केले. केवळ त्या आधारावर ही रिट याचिका फेटाळली जाऊ शकते. [परिच्छेद २३] [१०८३-एच;१०८४-ए]

उमेश कुमार नागपाल विरुद्ध हरयाणा राज्य **(१९९४) ४ एससीसी १३८ : [१९९४] ३ एससीआर ८९३;** *कॅनरा बँक महेश कुमार* **(२०१५) ७ एससीसी ४१२ : [२०१५] ९ एससीआर ७२४;** *बलबीर कौर आणि अन्य विरुद्ध स्टील अथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड आणि ईतर.* **(२०००) ६ एससीसी ४९३ : [२०००] ३ एससीआर १०५३;** *योगेश नागरावजी उगले विरुद्ध महाराष्ट्र राज्य मार्फत प्रधान सचिव व ईतर* **(२०२०) १९ एससीसी ४२६;** *स्टेट बँक ऑफ इंडिया विरुद्ध राजकुमार* **(२०१०) ११ एससीसी ६६१ : २०१० (३) एस सी ए एल ई ६३५ - संदर्भित.**

निर्णय विधी संदर्भ

[१९९४] ३ एससीआर ८९३	संदर्भ	परिच्छेद ५
[२०१५] ९ एससीआर ७२४	संदर्भ	परिच्छेद १५

[२०००] ३ एससीआर १०५३	संदर्भ	परिच्छेद १५
[१९९४] ३ एससीआर ८९३	संदर्भ	परिच्छेद १६

दिवाणी अपील अधिकारक्षेत्र: दिवाणी अपील क्रमांक ५१११/२०२२

मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद येथील खंडपिठाच्या दिनांक ०४.०८.२०२१ च्या रिट याचिका क्र.१२३५२/२०१८ मधील निर्णय व आदेशावरून.

देबल कुमार बॅनर्जी, ज्येष्ठ विधिज्ञ दिव्यांशू सहाय, कु. श्रद्धा नारायण, अक्षय समय, मिठू जैन, विधिज्ञ अर्जदारासाठी.

प्रग्यान प्रदीप शर्मा, नीरज कुमार गुप्ता, रणजीत कुमार सिंघ, कार्तिकेय दुतिया, कु. पल्लवी कुमारी, कु. आरती प्रसाद, अभिषेक कुमार, विधिज्ञ प्रतिवादीसाठी.

न्यायालयाचा न्यायनिर्णय न्यायमूर्ती इंदिरा बॅनर्जी यांचेद्वारे देण्यात आला.

१. अनुमती देण्यात आली.

२. हे अपील मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक ०४.०८.२०२१ रोजी दिलेल्या निर्णय व आदेशाविरुद्ध आहे. प्रतिवादीने दाखल केलेल्या रिट याचिकेस परवानगी देण्यात येवून तिला रिट याचिका क्रमांक २०१८ चा १२३५२ देण्यात आला आणि अनुकंपा नियुक्तीसाठी प्रतिवादीने दाखल केलेल्या अर्जावरून ज्येष्ठतेनुसार अनुकंपा नियुक्तीसाठी प्रतिवादीच्या प्रकरणाचा विचार करण्याचे निर्देश अपीलकर्त्याला दिले, "परंतु याचिकाकर्त्याने आयसीआयसीआय बँक लिमिटेडमधील लिपिक नोकरी सोडल्याच्या तारखेपासून".

३. प्रतिवादी-रिट याचिकाकर्त्याचे वडील श्री. वाय. पी. आरवडे हे अहमदनगर जिल्ह्यातील अपीलकर्ता बँकेच्या कोळगाव शाखेत विशेष सहाय्यक म्हणून कार्यरत होते, त्यांनी वैद्यकीय अपंगत्वाच्या कारणास्तव दि. १६.०४.२०१५ रोजी सेवेतून मुदतपूर्व स्वेच्छानिवृत्तीसाठी अर्ज केला.

४. प्रतिवादी रिट याचिकाकर्त्याच्या वडिलांची वैद्यकीय अपंगत्वाच्या कारणास्तव अकाली निवृत्तीची विनंती २६.०६.२०१५ पासून मंजूर करण्यात आली.

५. अपीलकर्ता-बँकेने भारत सरकार/ भारतीय बँक संघाने उमेश कुमार नागपाल विरुद्ध हरयाणा राज्य (१९९४) ४ एससीसी १३८ या खटल्यात या न्यायालयाच्या निरीक्षणानुसार व त्या अनुषंगाने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार मृत कर्मचारी / शारीरिकदृष्ट्या अक्षम कर्मचार्यांच्या आश्रितांसाठी वेळोवेळी योजना आखल्या आहेत.

६. 'अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीच्या बदल्यात सानुग्रह अनुदान एकरकमी देण्याची योजना' नावाची योजना, ज्याला पुढे "योजना" असे संबोधले जाते, १४.१२.२००५ पासून अंमलात आली. या योजनेत वैद्यकीय अपंगत्वाच्या कारणास्तव मुदतपूर्व निवृत्ती घेऊ इच्छिणाऱ्या कर्मचाऱ्यांना एकरकमी सानुग्रह अनुदान देण्याची तरतूद होती.

७. वैद्यकीय अपंगत्वामुळे अकाली निवृत्ती घेऊ इच्छिणाऱ्या अपिलकर्ता-बँकेचे कर्मचारी, वयाची ५५ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी, या योजनेचा लाभ मिळण्यास पात्र होते, या अटीवर की विहित गणनेनुसार कुटुंबाचे एकूण मासिक उत्पन्न कर्मचाऱ्याच्या शेवटच्या एकूण वेतनाच्या ६०% पेक्षा कमी असेल.

८. भारतीय बँक्स संघाने दि. ११.०८.२०१४ च्या सीआयआर/एचआर/२०१४-१५/५३२/४ या परिपत्रकाद्वारे भारत सरकारच्या मान्यतेनुसार सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये अनुकंपा नियुक्तीसाठी सुधारित योजना दिनांक ०७.०८.२०१४ च्या डीओ पत्र क्र.१८/२/२०१३-आयआर द्वारे कळविली आहे.

९. इंडियन बँक्स असोसिएशनने प्रसारित केलेली ही योजना अपीलकर्ता-बँकेने स्वीकारली होती. दि. ०८.०४.२०१८ च्या परिपत्रकाद्वारे अपीलकर्ता-बँकेने "अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती किंवा एकरकमी सानुग्रह अनुदान देण्याची योजना" अधिसूचित केली. जीला नंतर 'अनुकंपा नियुक्ती योजना' म्हणून संबोधले जाते. अनुकंपा नियुक्ती योजना दि. ०६.०८.२०१४ पासून लागू करण्यात आली.

१०. वर नमूद केल्याप्रमाणे, २५.०६.२०१५ च्या आदेशाद्वारे अपिलकर्ता-बँकेने प्रतिवादी रिट याचिकाकर्त्याचे वडील वाय. पी. आरवाडे यांना वैद्यकीय अपंगत्वाच्या कारणास्तव स्वेच्छेने सेवेतून निवृत्त होण्याची परवानगी दिली आणि त्यांना २५.०६.२०१५ पासून कर्तव्यातून मुक्त करण्यात आले.

११. दि. २०.०७.२०१५ रोजी प्रतिवादी रिट याचिकाकर्त्याने अनुकंपा नियुक्ती योजनेनुसार वडिलांच्या जागी अनुकंपा नियुक्तीसाठी अर्ज केला. असे दिसते की प्रतिवादी रिट याचिकाकर्त्याने अनुकंपा नियुक्तीसाठी अर्ज केला त्या वेळी तो आयसीआयसीआय बँक लिमिटेडमध्ये लिपिक म्हणून कार्यरत होता.

१२. अनुकंपा नियुक्तीसाठी केलेल्या अर्जात प्रतिवादी रिट याचिकाकर्त्याने आपण आयसीआयसीआय बँकेत कार्यरत असल्याचे वास्तव दडवले आहे. त्याने तो स्वत: बेरोजगार असल्याची चुकीची माहिती

दिली. प्रतिवादी रिट याचिकाकर्त्याने अनुकंपा नियुक्तीसाठी अर्ज सादर केल्यानंतर दि. ०२.०३.२०१६ रोजी म्हणजेच सुमारे आठ महिन्यांनी राजीनामा दिला.

१३. दि. २५ जानेवारी २०१८ रोजी अनुकंपा नियुक्ती योजनेंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या चार सदस्यीय समितीने प्रतिवादीच्या अर्जावर विचार केला. निवृत्त कर्मचाऱ्याला रु.२५,११०/- मासिक पेन्शन मिळत असून त्याव्यतिरिक्त त्याला एकूण रु.२७,०५,७६६/- असे इतर निवृत्त आर्थिक लाभ मिळाल्याचे समितीला आढळले. नंतर रु.१२,१०,०६१/- चे कर्ज दायित्व समायोजित केल्यास प्राप्त निव्वळ रक्कम रु.१४,९५,७०५/- होती. तसेच निवृत्त कर्मचाऱ्याच्या कुटुंबीयांना गुंतवणुकीतून रु.३,७०,४४२/- मिळाले. निवृत्त कर्मचाऱ्याचे कुटुंब गरीब नसल्याचे कारण देत समितीने याचिकाकर्त्याकडे प्रतिवादीच्या अनुकंपा नियुक्तीचा प्रस्ताव फेटाळून लावला कारण निवृत्त कर्मचार्याच्या कुटुंबाचे अंदाजे मासिक उत्पन्न रु.३६,७७३/- होते, जे निवृत्त कर्मचाऱ्याच्या रु.५५,९७८/- च्या शेवटच्या एकूण वेतनाच्या ६०% पेक्षा जास्त होते. अनुकंपा नियुक्ती योजनेंतर्गत अनुकंपा नियुक्तीची अट होती की, कुटुंबाचे एकूण उत्पन्न निवृत्त कर्मचाऱ्याच्या शेवटच्या एकूण वेतनाच्या ६० टक्क्यांपेक्षा जास्त नसावे.

१४. या ठिकाणी हे अकारण नमूद करणे आवश्यक आहे की निवृत्त कर्मचाऱ्याचे वडील वैद्यकीय अपंगत्वाच्या कारणास्तव सेवेतून अकाली निवृत्त झाले त्यावेळी प्रतिवादी रिट याचिकाकर्त्याला आयसीआयसीआय बँकेकडून मिळणारे मासिक वेतन विचारात न घेता निवृत्त कर्मचाऱ्याच्या कुटुंबाचे मासिक उत्पन्न गृहीत धरण्यात आले होते.

१५. उच्च न्यायालयाने कॅनरा बँक आणि अन्य विरुद्ध एम महेश कुमार (२०१५) ७ एससीसी ४१२; बलबीर कौर आणि अन्य. विरुद्ध स्टील ऑथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड आणि ईतर. (२०००) ६ एससीसी ४९३; आणि योगेश नागरावजी उगले विरुद्ध महाराष्ट्र राज्य मार्फत प्रधान सचिव व ईतर (२०२०) १९ एससीसी ४२६ मधील या न्यायालयाच्या निकालांचा संदर्भ दिला. प्रतिवादी-रिट याचिकाकर्त्याच्या वतीने उद्धृत करून असा युक्तिवाद केला गेला की प्रतिवादी-रिट याचिकाकर्त्याचा अनुकंपा तत्त्वावर अपीलकर्ता-बँकेच्या नोकरीत सामील होण्याचा अधिकार केवळ कुटुंब गरीब आहे म्हणून पराभूत केला जाऊ शकत नाही.

१६. अनुकंपा नियुक्तीचा दावा फेटाळण्यासाठी आर्थिक निकष हा आधार असू शकत नाही, हे कॅनरा बँक (उपरोक्त) या खटल्यातील विधान प्रमाण नाही. त्याऐवजी या न्यायालयाने उमेश कुमार नागपाल विरुद्ध हरयाणा राज्य (१९९४) ४ एससीसी १३८ मधील या न्यायालयाच्या आधीच्या निकालातील खालील परिच्छेद मान्यतेने उद्धृत केला आहे :-

> “२. ... अशा प्रकारे अनुकंपापूर्ण रोजगार देण्याचा संपूर्ण उद्देश कुटुंबाला अचानक आलेल्या संकटावर मात करण्यास सक्षम करणे हा आहे. अशा कुटुंबातील एखाद्या सदस्याला मृत व्यक्तीने धारण केलेल्या पदा पेक्षा कमी पद देऊ नये, हा त्यामागचा हेतू आहे. इतकेच काय, एखाद्या कर्मचाऱ्याचा नुसता मृत्यू झाल्याने त्याच्या कुटुंबाला उपजीविकेचे असे साधन मिळत नाही. सरकार किंवा संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाने मृतव्यक्तीच्या

कुटुंबाची आर्थिक स्थिती तपासून पाहिली पाहिजे आणि त्याचे समाधान झाले तरच कुटुंबातील पात्र सदस्याला नोकरी द्यायची आहे, हे संकट कुटुंबाला पेलता येणार नाही. तिसऱ्या आणि चौथ्या श्रेणीतील पदे ही नॉन मॅन्युअल आणि मॅन्युअल श्रेणीतील सर्वात खालची पदे आहेत आणि म्हणूनच त्यांना अनुकंपा तत्त्वावर दिले जाऊ शकते, ज्याचा उद्देश कुटुंबाला, आर्थिक दुर्बलतेतून मुक्त करणे आणि आणीबाणीच्या प्रसंगातून बाहेर पडण्यास मदत करणे हा आहे. नियमाला अपवाद करून अशा खालच्या पदांवर नोकरीची तरतूद भेदभावपूर्ण नसल्याने न्याय्य व वैध आहे. अशा पदांवर मृत व्यक्तीच्या अशा आश्रितांना देण्यात येणारी अनुकूल वागणूक ही साध्य करावयाच्या उद्दिष्टाशी म्हणजे दारिद्र्यापासून मुक्ती मिळविण्याच्या उद्दिष्टाशी तर्कशुद्ध आहे. त्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणाकडून इतर कोणतीही पदे अपेक्षित असणे किंवा देउ करण्याची आवश्यकता नाही. या संदर्भात हे लक्षात ठेवले पाहिजे की, मृतव्यक्तीच्या निराधार कुटुंबाच्या तुलनेत इतरही लाखो कुटुंबे आहेत जी अधिक निराधार नसली तरी तितकीच निराश्रीत आहेत. मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबियांच्या बाजूने करण्यात आलेल्या नियमाला अपवाद म्हणजे त्याने केलेली सेवा आणि वैध अपेक्षा आणि पूर्वीच्या नोकरीमुळे निर्माण झालेल्या कुटुंबाची स्थिती आणि व्यवहारात

झालेला बदल आणि त्यामध्ये अचानक घडून आलेल्या बदलाचा विचार केला जातो.

२०. अशा प्रकारे अनुकंपा तत्त्वावरील रोजगाराच्या दाव्याचा विचार करताना खालील बाबी लक्षात घ्याव्या लागतील.

(i) *सरकार किंवा सार्वजनिक प्राधिकरणाने जारी केलेले नियम किंवा कायदे नसल्यास अनुकंपा रोजगार निर्माण करता येत नाही. या विनंतीचा शासन योजनेनुसार काटेकोरपणे विचार केला जावा आणि या योजनेनुसार अनुकंपा नियुक्ती करण्यात कोणत्याही प्रकारचा भेदभाव करून अनुकंपा तत्त्वाचे नियम दुर्लक्षित करून नेमणूक करण्याचा कोणासही अधिकार नाही.*

(ii) *अनुकंपा रोजगाराच्या अर्जाला विनाकारण विलंब न करता प्राधान्य द्यावे व त्यावर योग्य कालावधीत विचार करावा.*

(iii) *अनुकंपा तत्त्वावरील नियुक्ती म्हणजे सेवेत असताना उपजीविका कमावनाऱ्या एकमेव व्यक्तीचा मृत्यू किंवा वैद्यकीय अक्षमतेमुळे कुटुंबात अचानक उद्भवणाऱ्या संकटाला सामोरे जाणे होय. त्यामुळे मृत/अपंग कर्मचाऱ्याच्या मृत्यूच्या वेळी किंवा अक्षमतेच्या वेळी त्याच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती कशीही असली तरी अनुकंपा म्हणून अनुकंपा रोजगार दिला जाऊ शकत नाही.*

(iv) *अनुकंपा रोजगार केवळ मृत/अपंग कर्मचाऱ्याच्या आश्रितांपैकी एकाला म्हणजेच आई-वडील, पती-पत्नी, मुलगा किंवा मुलगी यांनाच देण्याची परवानगी आहे आणि अशा नियुक्त्या केवळ खालच्या श्रेणीसाठी च असाव्यात ती म्हणजे तृतीय आणि चतुर्थ श्रेणीची पदे.*

१७. बलबीर कौर (उपरोक्त) प्रकरणात या न्यायालयाने मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबियांना मासिक देयकाची हमी देणारी कौटुंबिक लाभ योजना अनुकंपा नियुक्तीला पर्याय नसल्याचे म्हटले आहे. अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीसंदर्भातील लागू परिपत्रकाच्या संदर्भात हा निष्कर्ष काढण्यात आला आहे.

१८. उमेश नारावजी उगले (उपरोक्त) येथे अनुकंपा नियुक्तीवर २२.०८.२००५ रोजी घालण्यात आलेल्या बंदीच्या कारणास्तव अनुकंपा नियुक्ती नाकारण्यात आली होती जी २२.०३.२०१२ च्या ठरावाद्वारे कायम ठेवण्यात आली. मात्र, प्रतीक्षा यादीतील व्यक्तींना सुरुवातीला ३१.१२.२०११ पर्यंत सवलत देण्यात आल्याचे या न्यायालयाला आढळले. त्यानंतर दिनांक ०१.०३.२०१४ च्या ठरावाद्वारे महाराष्ट्र शासनाने अनुकंपा तत्त्वावरील गट 'क' व 'ड' पदांची भरती २०१२ पासून वर्ग 'क' व 'ड' च्या रिक्त पदांच्या ५ टक्क्यांवरून १० टक्के करण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे २००५ च्या बंदीनंतरही सरकार अनुकंपा तत्त्वावर नियुक्त्या करत असल्याचा निष्कर्ष सर्वोच्च न्यायालयाने काढला. अनुकंपा नियुक्ती देण्याच्या आर्थिक निकषांचा प्रश्न योगेश नागरावजी उगले (उपरोक्त) येथे मुळीच नव्हता.

१९. आमच्या मते, अनुकंपा नियुक्ती योजनेअंतर्गत नियुक्तीस पात्र असलेल्या उमेदवाराला अनुकंपा नियुक्ती नाकारण्याचे आधारभूत कारण कुटुंब गरीब आहे की नाही, हे असू शकत नाही असा निष्कर्ष काढताना खंडपीठाने चूक केली आहे.

२०. अनुकंपा नियुक्ती हा समानतेच्या नियमाला अपवाद आहे, ज्यामुळे वैद्यकीयदृष्ट्या अक्षम कर्मचाऱ्यास निवृत्त होण्याशिवाय पर्याय नसतो व त्यामुळे कर्मचाऱ्याच्या आश्रित कुटुंबातील सदस्यांना पात्रता प्राप्त होते किंवा मृत कर्मचाऱ्याला कमावत्या व्यक्तीच्या अपंगत्वामुळे किंवा मृत्यूमुळे उद्भवलेल्या तात्कालिक संकटावर मात करता येते. अनुकंपा नियुक्तीमुळे नोकरीची खूप गरज असलेल्या तितक्याच किंवा अधिक गुणवंत उमेदवारांना नियुक्तीकरिता असलेल्या विचाराधीन क्षेत्रातून वगळले जाते. त्यामुळे अनुकंपा नियुक्तीचा विचार मृत/ अकाली सेवानिवृत्त कर्मचाऱ्याला लागू असलेल्या अनुकंपा नियुक्तीच्या प्रचलित नियमांनुसार काटेकोरपणे व्हायला हवा.

२१. अशा वेळी अनुकंपा नियुक्ती योजनेंतर्गत अनुकंपा नियुक्तीसाठी पात्रतेचे आर्थिक निकष आहेत. अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीसाठी आर्थिक निकषांची तरतूद करणारे नियम वैध आणि कायदेशीर नियम आहेत ज्यांचा काटेकोरपणे अर्थ लावावा लागेल, अन्यथा अनुकंपा नियुक्तीसाठी राखीव कोटा अधिक आणि / किंवा अधिक तीव्र आर्थिक संकटात असलेल्या इतरांना वगळून भरला जाईल.

२२. स्टेट बँक ऑफ इंडिया विरुद्ध राजकुमार या खटल्यात (२०१०) ११ एससीसी ६६१ मध्ये अपीलकर्ता-बँकेच्या वतीने बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील श्री. देबल कुमार बॅनर्जी यांनी उद्धृत केल्याप्रमाणे, अनुकंपा नियुक्तीचा दावा केवळ नियोक्त्याने अशा रोजगारासाठी तयार केलेल्या योजनेत आढळतो आणि अशा

योजनेबाहेर कोणताही अधिकार नाही. केवळ अर्जावर स्वयंचलित नियुक्ती होऊ शकत नाही. प्रतिवादी-रिट याचिकाकर्त्याला निवृत्त कर्मचाऱ्याचे आश्रित कुटुंबीय म्हणून नोकरीचा कोणताही विशेष दावा किंवा विशेष अधिकार नव्हता.

२३. अनुकंपा नियुक्ती योजनेंतर्गत अनुकंपा नियुक्तीच्या आर्थिक निकषांकडे दुर्लक्ष करून उच्च न्यायालयाने चूक केली. शिवाय, अनुकंपा नियुक्तीच्या अर्जात प्रतिवादीने आयसीआयसीआय बँकेतील आपली नियुक्ती दडपून ठेवली होती, याकडे उच्च न्यायालयाने पूर्णपणे दुर्लक्ष केले. केवळ त्या आधारावर ही रिट याचिका फेटाळली जाणे योग्य आहे.

२४. अनुकंपा नियुक्तीसंदर्भातील कायदा व्यवस्थित निकाली निघाला आहे, त्यामुळे देबलकुमार बॅनर्जी यांनी उद्धृत केलेल्या इतर निर्णयांवर चर्चा करण्याची या न्यायालयाला गरज नाही, विशेषत: प्रतिवादी-रिट याचिकाकर्त्याने केलेल्या अनुकंपा नियुक्तीच्या अर्जामध्ये भौतिक तथ्ये दडवण्याच्या एकमेव कारणास्तव त्याचा अर्ज फेटाळला जाणे योग्य आहे.

२५. त्यानुसार अपील मंजूर केले जाते. आक्षेपार्ह निर्णय व आदेश रद्द बातल ठरवला जातो. खर्चाबाबत कोणतेही आदेश नाहीत.

अपील मंजूर

****** अस्वीकरण ******

ह्या न्याय निर्णयाच्या मराठी भाषेतील ह्या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेन्या पुरताच मर्यादीत राहील आणि त्याचा ईतर कोणत्याही कारणाकरिता वापर

करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्याय निर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापरा करिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करीता वैध मानला जाईल.